# ‘चले जाव चळवळी’तील क्रांतीज्योती - अरुणा असफ अली

**निशांत राजेंद्रकुमार गोंधळी**
सहा. प्राध्यापक,
स.ब. खाडे महाविदयालय, कोपार्डे

'छोडो भारत चळवळ', 'चले जाव चळवळ' आणि 'ऑगस्ट क्रांती' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या चळवळीला भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये एक अभूतपूर्व महत्त्व असल्याचे दिसून येते. क्रिप्स योजनेच्या अपयशानंतर भारतीय समाजात उसळलेला असंतोष १९४२ च्या छोडो भारत चळवळीच्या माध्यमातून बाहेर पडला. या चळवळीमध्ये पुरुषांबरोबरच स्त्रियांचे योगदान अनन्यसाधारण आहे. या चळवळीच्या काळात देशातील सर्वसामान्य जनता तसेच प्रमुख नेत्यांसोबतच महिलांनी अतुलनीय शौर्य आणि लढाऊ वृत्तीचे दर्शन घडवले. १४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीमध्ये 'भारत छोडो' प्रस्तावाला संमती मिळाली.[१] निर्घृण दडपशाही आणि मूलभूत नागरी स्वातंत्र्याची गळचेपी, अन्याय, अत्याचार, पिळवणूक अशी सर्वांगाने प्रतिकूल परिस्थिती होती. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या काँग्रेस बैठकीत म्हटले गेले,
"भारतातून इंग्रजांची सत्ता समाप्त होणे भारत व संयुक्त राष्ट्र दोघांच्याही हिताचे आहे. ही सत्ता राहणे आता भारतासाठी अपमानकारक आहे आणि भारताला दिवसेंदिवस दुर्बल केले जात आहे. आपल्या संरक्षणासाठी असमर्थ बनवले जात आहे आणि ही गोष्ट जागतिक स्तरावर स्वातंत्र्य निर्मितीत सहभागी होण्याच्या मार्गातील अडथळा आहे."[२]

मुंबईच्या गवालिया टँकवर भरलेल्या सभेत गांधीजींनी 'करेंगे या मरेंगे' चा नारा दिला आणि ८ ऑगस्टच्या मध्यरात्री भारतीय प्रमुख नेत्यांची इंग्रजांकडून धरपकड सुरू झाली. पण गांधीजींनी केलेल्या भाषणातील सांगण्यानुसार प्रत्येक भारतीय नागरिक हा नेता बनला आणि चले जाव चळवळीत ताकद आली. स्वातंत्र्यप्रेमाने प्रेरित झालेल्या १९४२ च्या या लढ्यात महिलांनीही इंग्रज राजवटीला प्रत्युत्तर देण्याचा निश्चय केला. अनेक स्त्रियांनी प्राण पणाला लावून 'ऑगस्ट क्रांती' लढ्यात उडी घेतली. यामध्ये जिद्दी, महत्त्वाकांक्षी, लढाऊ, शूर महिला स्वयंस्फूर्त प्रेरणेने सहभागी झाल्या आणि या चळवळीने भक्कम चाल घेतली हे विशेष. त्यामध्ये अरुणा असफ अली यांचे कार्य विशेष अधोरेखित करण्याजोगे आहे.

पूर्वाश्रमीच्या अरुणा उपेंद्रनाथ गांगुली. सुप्रसिद्ध मुस्लिम वकील असफ आली यांच्याशी आंतरधर्मीय विवाहानंतर झालेल्या अरुणा असफ आली. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारी महिला, वीरांगणा, शिक्षणतज्ञ, राजकीय कार्यकर्त्या, प्रकाशक आणि भारतरत्न.[३] त्या पेशाने इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका होत्या. महात्मा गांधी, मौलाना आझाद, जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, राम मनोहर लोहिया यांच्या विचारांचा वारसा ज्यांच्या कार्यामध्ये विशेषत्वाने दिसतो अशा अरुणा असफ अली यांचा असफ अली यांच्यामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीशी संबंध आला. विचाराने समाजवादी, वृत्तीने महत्त्वाकांक्षी आणि कार्याने क्रांतिकारी असणाऱ्या अरुणा असफ अली यांनी तरुणांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेण्यासाठी खूप खटाटोप केला. प्रमुख नेत्यांची धरपकड सुरू होतीच.[४]

९ ऑगस्ट रोजी कस्तुरबा गांधी गवालिया टँकवर झेंडावंदन करणार होत्या. पण त्या पकडल्या गेल्या. मग आता झेंडावंदन कोण करणार ? सारी मुंबई क्रांती मैदानावर लोटली होती. इंग्रजांचा अश्रुधूर आणि लाठीहल्ला सुरू होता. या साऱ्यातच गर्दीला बाजूला सारत ध्वजस्तंभाकडे एक मुलगी गेली आणि झेंडा फडकवला. ध्वजगीत 'वंदे मातरम' म्हटले आणि ज्या तडफेने ती आली त्याच तडफेने निघून गेली व भूमिगत झाली. ती भूमिगत झालेली मुलगी म्हणजेच अरुणा असफ अली.[५] 'रिसर्जेस ऑफ़ इंडियन विमेन' या आपल्या पुस्तकात अरुणा असफ अली म्हणतात, "मैं फुर्ती से मंच पर चढ़ गई और कांग्रेस का ध्वज फहराने के लिए डोरी खींच दी. मेरे ऐसा करते ही पुलिस ने भीड़ पर आँसू गैस के गोले फेंकने शुरू कर दिए"[६]

इंग्रजांच्या हाती लागू नये यासाठी भूमिगत राहून समाजवादी गटाच्या साहाय्याने त्यांनी पुढे चळवळ सुरू ठेवली. जनता सरकार (बिहार), पत्री सरकार (सातारा) यांना त्या भूमिगत राहून मदत करत होत्या. आ-सेतू हिमाचल फिरत होत्या. तरुणांना

चळवळीत सामील करून घेत होत्या. त्यांना पकडण्यासाठी इंग्रजांनी पाच हजारांचे बक्षीससुद्धा जाहीर केले. पण शेवटपर्यंत इंग्रजांच्या हाती त्या काही लागल्या नाहीत.[७] १९४२ ते १९४६ ही चार वर्षे भूमिगत राहून त्यांनी चळवळीला मदत केली. दरम्यान काँग्रेसच्या आंतरप्रांतीय हालचालींना त्या मार्गदर्शन करत राहिल्या. दिल्लीतील भूमिगत चळवळीच्या प्रमुख राहिल्या. भूमिगत कार्यकर्त्यांच्या गटांना भेटून प्रसंगी त्यांना आर्थिक साहाय्यही देत राहिल्या. राम मनोहर लोहिया यांच्यासोबत काँग्रेसच्या 'इन्किलाब' नियतकालिकाच्या संपादक म्हणूनही त्यांनी काम केले.[८]

संपूर्ण कार्य भूमिगत राहून करत असल्यामुळे त्यांची तब्येत खालावत जात होती. त्यांच्या तब्येतीची काळजी म्हणूनच गांधीजींनी त्यांना भेटण्यास बोलवले आणि ग. प्र. प्रधान यांच्याकडे या भेटीची जबाबदारी दिली. पारशी महिलेचा वेश परिधान करून अरुणा असफ अली पुण्याच्या पारसी सॅनिटोरियमच्या मागील बाजूस असणाऱ्या गांधीजींच्या कुटीमध्ये पोहोचल्या. जवळपास एक तास झालेल्या चर्चेअंती "हिंसक मार्गाने जाऊ नको" असा गांधीजींकडून त्यांना सल्ला दिला गेला. पण "मी तुमचा अत्यंत आदर करते. पण आपले विचार जुळणारे नाहीत. मी क्रांतिवादी आहे आणि क्रांतीवादी म्हणूनच काम करणार. आपल्याला शक्य असल्यास मला आशीर्वाद द्यावा. मी माझा मार्ग सोडणार नाही. आपले रस्ते वेगळे आहेत." हे सांगण्याचे धाडस अरुणा असफ अली यांनी दाखवले.[९]

अरुणा असफ अली यांना अटक करणे ब्रिटीश सरकारसाठी आव्हानात्मक होते. त्यासाठीच अरुणा असफ आली यांचा मागोवा काढणाऱ्या व्यक्तीला सरकारने बक्षिस जाहीर केले. भूमिगत असताना त्यांनी उषा मेहता यांच्यासोबत मिळून काँग्रेसच्या गुप्त रेडिओ स्टेशनचे प्रसारण सुरू केले. त्यांच्यावर वीर सावरकर यांच्या 'इंडियाज फर्स्ट वार ऑफ इंडिपेंडन्स' या पुस्तकाचा चांगलाच प्रभाव होता. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी सावरकरांबद्दल आदर होता, हे दिसून येते.[१०] १९४६ मध्ये त्यांच्यावरील अटक वॉरंट रद्द करण्यात आले आणि पुन्हा त्या मोठ्या ताकदीने सक्रिय झाल्या.

पुढील काळात दिल्ली प्रदेश काँग्रेस समिती अध्यक्ष (1947), समाजवादी पक्षात प्रवेश (1948), डावा समाजवादी पक्ष निर्मिती (1950), अखिल भारतीय कामगार संघटनेच्या उपाध्यक्ष, दिल्लीच्या पहिल्या महापौर (1958) आणि भारताच्या राजदूत म्हणूनही त्यांनी अमेरिकेत कार्य केले.

'Travel Talk' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत "अरुणा हे एक अस्वस्थ आणि दुसऱ्यांना अस्वस्थ करणारे व्यक्तिमत्व आहे." असे पंडित नेहरूंनी वर्णन केले आहे.

तर युसुफ मेहर अली म्हणतात, "झाशीच्या राणी लक्ष्मीबाईनंतर अरुणाताई याच स्वातंत्र्ययुद्धाच्या नायिका होत्या."

कांग्रेसच्या नेत्या आणि लेखिका सत्यवती मलिक यांच्या कन्या कपिला वात्स्यायन म्हणतात, "अरुणा जी का रात में घर आना और किसी को भनक लग पाने से पहले ही सवेरे-सवेरे घर से चले जाना हमारे लिए एक महान राष्ट्रीय साहसी अभियान और एक जासूसी नाटक के परिधि पात्र की भूमिका निभाने के रोमाँच से भरा हुआ था."

एकूणच विचार करता छोडो भारत चळवळीतील अरुणा असफ अली यांचे कार्य क्रांतिकारी असल्याचे दिसून येते. त्यांच्या या क्रांतिकारी कार्याच्या सन्मानार्थ भारत सरकारने १९९२ मध्ये त्यांना 'पद्मविभूषण', तसेच मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्कार (१९८७) दिला. तर 'सोविएतलँड नेहरू पुरस्कार', 'लेनिन पुरस्कार', 'इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार', आंतरराष्ट्रीय सामंजस्याबदल 'नेहरू पुरस्कार' अशा अनेक पुरस्कारांनी गौरवले गेले.

**संदर्भ सूची :**

१) इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडेंस - बिपन चंद्र (पान नं. ५२९)

२) आधुनिक भारताचा इतिहास बी एल ग्रोवर व एन के बेल्हेकर (पान नं. ४८४)

३) ई टीव्ही महाराष्ट्र लेख

४) मराठी विश्वकोश

५) रोहिणी गवाणकर मुलाखत - डीडी सह्याद्री वहिनी

६) रिसर्जेंस ऑफ इंडियन विमेन - अरुणा असफ अली

७) रोहिणी गवाणकर मुलाखत - डीडी सह्याद्री वाहिनी

८) मराठी विश्वकोश

९) बीबीसी मराठी लेख - नामदेव काटकर

१०) मराठी विश्वकोश

११) साधना साप्ताहिक (१५ ऑगस्ट १९९७) लेख 'भारतीय महिला व स्वातंत्र्यलढा : १८५७ ते १९४७' - रोहिणी गवाणकर